# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 12/07/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावरील मौजा वार्ड क्र. 7 कामडी एमआयडीसी चौक कळमेश्वर येथे दि. 08/07/2021 चे 07.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– नंदकुमार मानिकराव कोठे, वय 52 वर्ष, रा. बेलेकर ले आउट वार्ड क्र. 10, कळमेश्वर यांच्या मुलगा रितेश कोठे हा सकाळी एमएच– 40/बिझेड–6717 क्रमांकाच्या ॲक्टीवा 6 जी डिएलएस दुचाकी ने एमआयडीसी पार्किंग मध्ये गाडी लॉक करुन ठेवुन जिम मध्ये गेला होता. त्यादरम्यान एक तासानी जिम करुन तो परत आला तेव्हा गाडी दिसली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीची लाल रंगाची कि. 2,5000/– रु. ची दुचाकी चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथ आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजवार श्री नारनवरे मो.नं 9764004385 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 10/07/2021 चे 13.00 वा. ते 18.00 वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि काटोल ला सामान घेण्यासाठी जातो म्हणुन घरून निघून गेली. यानंतर फिर्यादी हिला 02.00 वा. अल्पवयीन मुलीने मोबाईलवर फोन करून सांगितले की, ''मी काटोल ला आहे व मालापूरला जात आहे, सांयकाळी पर्यंत घरी येते'' असे सागितले. परंतु ती परत आली नाही फिर्यादीने आजूबाजूला इकडे तिकडे शोध घेतला मिळून आली नाही व आतापर्यंत घरी आली नाही. फिर्यादीच्या मुलीला फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतून अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर